1) **Solving Sensational Cases**

2) Chandwad Police Station

3) 06/12/2015

**Brief Facts** :

On 06/12/2015 around 20.00 hrs. Shri Khade, Sub-Divisional Police Officer, Manmad Division received a tip from informant that huge amount of Ganja is being transported towards Nashik in a truck no. MH-15-DK-9554. Shri. Khade formed a special team and laid a trap at Chandwad toll naka. The said vehicle was intercepted at Chandwad toll naka at around 20.45 hrs. When police searched the vehicle they found 1300 kg Ganja worth Rs. 1,35,19,570/- hid inside truck in blue plastic bags. Police seized Ganja and said vehicle. An offence vide Chandwad PS C.R.No. II 3077/2015 u/s 20B, 22, 27 of NDPS Act was registered.

Accused named 1) Chakradharrao M Mohanrao, age- 38, R/o Thiyapuram, East Godavari, Andhra Pradesh, 2) Shaikh Sahavali Shaikh Ahmed, age- 43, R/o Atmapur, Karnool, Andhra Pradesh have been arrested in the said offence and further investigation is going on.

# १.३५ कोटींचा गांजा पकडला

## चांदवडला टेम्पोसह दोघांना अटक

। चांदवड । वार्ताहर ।

हैदराबादहून मुंबई बाजूकडे आयशर टेम्पोमधून जाणारा सुमारे दीड कोटी रुपयांचा १३ क्विंटल गांजा चांदवड पोलिसांनी मंगरुळ टोलनाक्यावर सापळा रचून जप्त केला. या गुन्ह्यात पोलिसांनी आयशर टेम्पोसह सुमारे १ कोटी ३५ लाख १९ हजार ५७० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून दोघांना अटक केली आहे. अंमली पदार्थ विरोधातील नाशिक जिल्ह्यातील आतापर्यंतचा सर्वात मोठा गुन्हा उघडकीस आणण्यात चांदवड पोलिसांना यश आल्याने पोलिसांचे सर्वत्र कौतुक होत आहे. या कारवाईमुळे परराज्यातून महाराष्ट्रात गांजाची पुरवठा करणारी मोठी टोळी उघडकीस येण्याची शक्यता आहे.

हैदराबाद येथून तीन दिवसांपूर्वी गांजाने भरलेला टेम्पो निघाल्याची गुप्त माहिती मनमाड विभागाचे पोलिस उपअधीक्षक डॉ. राहुल खाडे यांना मिळाल्याने त्यांनी अप्पर पोलिस अधिक्षक सुनील कडासने यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक अनंत मोहिते, सहायक पोलिस निरीक्षक मधुकर वराडे, पोलिस कर्मचारी बी. डी. गुळे, श्रीकांत आहेर, चंद्रकांत निकम, संजय मोरे, जगन मोरे आदींच्या पथकाने तत्काळ सापळा रचून मंगरुळ टोलनाक्यावर नाकाबंदी केली. रविवारी (दि.६) सायंकाळी ८ वाजेच्या सुमारास एम.एच.१५ डीके ९५५४ या क्रमांकाचा आयशर टेम्पो येवला-मनमाड बाजूकडून मंगरुळ टोलनाक्यावर आल्यानंतर त्याची झडती घेतली असता प्रथमदर्शनी टेम्पोमध्ये मागील बाजूस रिकामे असलेले प्लास्टीक क्रेटस आढळून आले. जणूकाही शेतीमालाची वाहतूक करण्यासाठी टेम्पो जात असल्याचे भासविण्यात आले होते. मात्र पोलिसांना गांजासदृश अंमली पदार्थाचा वास आल्याने त्यांचा संशय बळावला. पोलिसांनी टेम्पोतील सर्व रिकामे क्रेटस् बाहेर काढून टेम्पो रिकामा केला तरीही त्यात काहीही आढळून आले नाही. टेम्पोमधून गांजाचा वास येतच होता

पान ७



चांदवड येथे पोलिसांनी जप्त केलेले गांजाने भरलेले पोते व गुन्ह्यातील आयशर टेम्पो. इनसेटमध्ये प्लास्टिक पॅकेटमध्ये भरण्यात आलेला गांजा



"नाशिक जिल्ह्यात माझ्या कारकिर्दीत प्रथमच एवढ्या मोठ्या प्रमाणावर अंमली पदार्थ जप्त करण्याची कारवाई झाली आहे. या गुन्ह्याचा सखोल तपास करून मुख्य सूत्रधारापर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केला जाईल.

– सुनील कडासने
(अपर पोलिस अधीक्षक, मालेगाव)



"मनमाड उपविभागांतर्गत अवैध धंद्यांवर व अवैध मद्य विक्रीबाबत विशेष मोहीम सुरू असून कोणत्याही प्रकारच्या अवैध धंद्यांना थारा दिला जाणार नाही. त्याबरोबरच गुन्हेगारी नियंत्रणासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जात आहे.

– डॉ. राहुल खाडे
(पोलिस उपअधीक्षक, मनमाड)

## १.३५ कोटींचा गांजा पकडला

मात्र त्यात काहीही आढळून येत नसल्याने प्रारंभी पोलिसही चक्रावले. मात्र टेम्पोची सखोल तपासणी केली असता कॅबीनच्या मागील भागात टेम्पोमध्ये सुमारे ४ फूट रुंदीचा व ७ फूट उंचीचे गुप्त कंपार्टमेंट तयार केलेले असल्याचे आढळले. हे कंपार्टमेंट चारही बाजूंने बंदिस्त असल्याने त्यात प्रवेश कुठून करायचा असा प्रश्न पोलिसांना पडला. त्यामुळे पोलिसांनी टेम्पोवरील ताडपत्री काढण्याचा निर्णय घेतला. एकावर एक असे ताडपत्रीचे तीन थर असल्याने ताडपत्री काढण्यासाठी पोलिसांना चांगलीच कसरत करावी लागली. या गुप्त कंपार्टमेंटमध्ये पोलिसांनी वरील भागातून प्रवेश केला असता त्यात ओलसर गांजाचे दोन ते अडीच किलोची पॅकिंग केलेले ५५२ पॅकेटस् आढळून आले. पॅकेटची तपासणी केली असता निळ्या व पांढऱ्या रंगाच्या प्लास्टिक पिशव्यांमध्ये आतून खाकी कागद लावून प्लास्टिक दोरीने बांधलेला ओलसर हिरव्या रंगाचा चुरगळलेल्या पानांचा व बियांचा गांजा आढळून आला. टेम्पोतील सर्व पॅकेट उतरवून गांजाचे वजन केले असता तब्बल १३ क्विंटल निव्वळ गांजा भरला. टेम्पोतील एवढ्या मोठ्या प्रमाणात असलेला गांजा उतरविताना गांजाच्या उग्र वासाचा सामना करावा लागल्याने पोलिसांची चागलीच दमछाक झाली. पोलिसांनी निवासी नायब तहसीलदारांच्या उपस्थितीत रितसर पंचनामा करून १ कोटी ३० लाख रुपये किमतीचा १३०० किलो गांजा, ५ लाख रुपये किमतीचा आयशर टेम्पो, ६५०० रुपयांचे जुने क्रेटस्, टेम्पोचालकाच्या अंगझडतीत सापडलेले १० हजार ८१० रुपये रोख व एक मोबाईल मिळून ११ हजार ८१० रुपयांचा ऐवज, क्लिनर शेख शाहवली याच्या अंगझडतीत सापडलेली १२६० रुपये रोख रक्कम असा एकूण १ कोटी ३५ लाख १३९ हजार ५७० रुपयांचा ऐवज जप्त करून ताब्यात घेतला. याप्रकरणी चक्रधरराव एम. मोहनराव (३८), शेख शाहवली शेख अहमद (४३) दोघे राहणार आंध्र प्रदेश व चिंटू सर (पूर्ण नाव माहीत नाही) रा. हैदराबाद या तिघांविरुद्ध अंमली पदार्थांच्या तस्करीबाबत चांदवड पोलिसांनी गुन्हा दाखल करून चक्रधरराव मोहनराव व शेख शाहवली यांना अटक केली आहे. याबाबत पोलिस उपअधीक्षक डॉ. राहुल खाडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक अनंत मोहिते व त्यांचे सहकारी अधिक तपास करीत आहेत.